महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक: पोमसं-३अ/१०/जीटी-२६(रा.पो.नि.)/ ०३/२०२६ मुंबई, दिनांक: २५/०५/२०२६

वाचा:- १. महाराष्ट्र पोलीस कायदा - १९५१.
२. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दिनांक २२/०५/२०२६ च्या बैठकीचे इतिवृत्त (वर्तुळीत पध्दतीने).

**-: आदेश :-**

महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१, मधील कलम २२ न, पोट कलम (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी **विहित कालावधी पूर्ण न झालेल्या** राखीव पोलीस निरीक्षक यांच्या विनंतीचा सांगोपांग विचार करून, विशेष बाब म्हणून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविल्या प्रमाणे बदलीचा निर्णय घेण्यात आला आहे.

| अ. क्र. | राखीव पोलीस निरीक्षकांचे नाव | सध्याची नेमणूक | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | महेश शिवराम साळवी | पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर | सातारा |

२. संबधित घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधित पोलीस अधिका-यांना तात्काळ बजावून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. बदली झालेल्या अधिका-यांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणा-या अधिका-यांची वाट पाहू नये.

३. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. बदली आदेशानंतर जे पोलीस अधिकारी रूग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजवावा.

५. घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या पोलीस अधिका-यांची नावे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या पोलीस अधिका-यांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे पोलीस अधिकारी बदली ठिकाणी कार्यमुक्त करूनही वेळेत बदलीवर हजर होणार नाहीत, अशा पोलीस अधिका-यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्या विरूध्द घटक प्रमुखांनी शिस्तभंग विषयक कार्यवाही तातडीने सुरू करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध:- कार्यासन क्रमांक ३ अ यांना ई-मेल द्वारे (desk३a.dgoffice@mahapolice.gov.in) पाठवावी.

**( सुप्रिया पाटील यादव)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरीता.

**प्रति,**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य., मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक , कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर
पोलीस अधीक्षक, सातारा
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, महाराष्ट्र शासन, २ रा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२.
महालेखाकार- ०१, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

२/- यांनी सदरचे आदेश विहित कालावधी पूर्ण न झालेल्या राखीव पोलीस निरीक्षक यांची बदली - २०२६ (Tenure Not Complete Reserve Police Inspectors Transfer-२०२६) या विषया खाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करून द्यावेत.

कार्यालय अधीक्षक, का.क्र. ९, ११, ३६ व ४०